तात्काळ / महत्वाचे
कालमर्यादा

जा.क्र.शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१४
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक :- 17 MAY 2014

प्रति,

अध्यक्ष / सचिव,
राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ, लांडेवाडी, भोसरी, पुणे

विषयः- सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भः- १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. २४)
२. शासन निर्णय एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम-२ मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक २६ फेब्रुवारी २०१४

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता / विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०२ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा /दर्जावाढ | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १८५ | पुणे | राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ, लांडेवाडी भोसरी, पुणे | ज्ञानभक्ती इंटरनॅशनल स्कूल, ग. नं. १०१, डूडूळगांव, मोशी, ता. हवेली, जि. पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | प्राथमिक | २०१४-१५ |

अटी व शर्ती :-

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून असेल.
४. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये ज्या वर्गास परवागनी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.
५. परवागनी मिळालेपासून १८ (अठरा) महिन्यांच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरू न केल्यास सदर परवानगी आपोआप रद्दबातल ठरेल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
७. शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी प्राप्त शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन व्यवस्थापनाने शाळा मान्यतेकरिता माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ०३ परिशिष्ठ ०२ मधील विहित नमुन्यात एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेचा प्रस्ताव सक्षम अधिका-यांकडे सादर करणे आवश्यक राहील.
१०. सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीएसई, आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक २० जुन २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविणेसाठी शासनास अर्ज करेल.
११. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना U-DISE मध्ये माहिती भरतांना स्वयंअर्थसहाय्यित शाळा / वर्ग / म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
१२. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजवणी करणे संस्थेला बंधनकारक राहील.

16/5/14

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,
१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे / अहमदनगर/सोलापूर.

महाराष्ट्र शासन

# शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे कार्यालय


१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१

फॅक्स क्रमांक ०२०-२६१२५६९६

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२२१७

वेब साईट आयडी क्रमांक www.dydepune.co.in

ई मेल आय.डी.क्रं dydpune@gmail.com


जा.क्र. शिउसं/माध्य-३०१/ स्वंय.अ.शा./२०२२-२०२३/४०७०

दिनांक : 05 APR 2023

प्रति,

अध्यक्ष/सचिव,

राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ, लांडेवाडी, भोसरी, पुणे-४११०३९

विषय : महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष **२०२३-२४** पासून **इ. ६ वी ते इ. १० वी** स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरु करण्यासाठी मिळालेल्या शासन मान्यतेचे अनुषंगाने करावयाचे कार्यवाहीबाबत.
**राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ, लांडेवाडी, भोसरी, पुणे-४११०३९ संचलित ज्ञानभक्ती इंटरनॅशनल स्कूल, गट नं.१०१, डुडुळगांव, ता.हवेली, जि.पुणे**

संदर्भ : १. श्री.प्रदिप पडोळे,कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, विस्तार भवन मुंबई-३२ यांचेकडील मान्यता पत्र जा.क्र. **एसएफएस-१०२१/प्र.क्र. ३१२/एसएम-२, दिनांक १५/३/२०२३**
**२. अध्यक्ष, राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ, लांडेवाडी, भोसरी, पुणे यांचे पत्र दि.१७/३/२०२३**

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, **राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ, लांडेवाडी, भोसरी, पुणे-४११०३९ संचलित ज्ञानभक्ती इंटरनॅशनल स्कूल, गट नं.१०१, डुडुळगांव, ता.हवेली, जि.पुणे** या **प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते माध्यमिक इ. ६ वी ते इ. १० वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.** संलग्नित शाळेस संदर्भीय क्र. १ चे शासन आदेशान्वये शैक्षणिक वर्ष **२०२३-२०२४** पासून सदर नवीन शाळा सुरु करण्याची मान्यता संदर्भीय क्र. १ चे शासन आदेशातील अ.क्र. १ ते १२ च्या अटी व शर्तीस अधिन राहून देण्यांत आलेली आहे.

सदर अटी व शर्ती आपल्या संस्थेस/शाळेस बंधनकारक असून त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम २०२० मधील तरतुदीनुसार करण्यांत यावी.

(औदुंबर उकिरडे)
अध्यक्ष,क्षेत्रस्तरीय प्राधिकरण,
तथा शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रत : माहितीस्तव सविनय सादर

१. मा. अध्यक्ष, राज्यस्तरीय प्राधिकरण तथा मा.आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे
२. मा. सदस्य सचिव, तथा मा.शिक्षण सहसंचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे
३. श्री. प्रदिप पडोळे, कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
४. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे